CNR NO.MHSO060011912023

**नियमित दिवाणी दावा क्र.६४/२०२४**

हणमंत सपताळ
*विरुध्द*
उपविभागीय अभियंता, वगैरे

## निशाणी क्र.५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी यांनी वाद मिळकतीमधुन नवीन रस्ता तयार करण्यास, वादीच्या वादमिळकतीवरील ताब्यास हरकत अडथळा निर्माण करण्यास, अतिक्रमण करण्यास तसेच वादमिळकतीमधील वादीचे बांधकाम पाडण्याचे कृत्य करण्यास तात्पुरती मनाई करण्याचा हुकूम मिळण्यासाठी केलेला आहे.

२. **वादीचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे आहे** –

वादीचे कथन आहे की, मौजे शिरभावी येथील गट क्र.६७/१ व ६७/४ या एक सलग असून, वादीच्या मालकी व कब्जेवहिवाटीच्या आहेत. (सदरील मिळकतींना 'वादमिळकत' संबोधले जाईल). वादीचे कथन आहे की, वादमिळकतीच्या दक्षिणेस गट क्र.६६ हा आहे. गट क्र.६६ च्या उत्तरेस हलदहिवडी ते उंबरगांव हा शासकीय रस्ता गेलेला आहे. सदरील रस्ता हा वादमिळकतीच्या दक्षिण बाजुस गट क्र.६६ मधून गट क्र.६७ चे पुर्व–दक्षिण कोपऱ्यातुन जातो. तो गाडी रस्ता आहे.

३. वादीचे कथन आहे की, उपरोक्त उल्लेखित रस्ता हा वादीच्या मिळकतीपासून ३०० फुट अंतरावर आहे. त्यामुळे वादीने सदरील रस्त्यावर अथवा रस्त्याच्या हद्दीत अतिक्रमण करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. असे असतांना प्रतिवादी यांनी दिनांक १६.११.२०२२ रोजी वादीस सदरील रस्त्याच्या हद्दीमधील केलेले अतिक्रमण काढून घेण्यास कळविले. वादीने कोणतेही अतिक्रमण केलेले नाही असा खुलासा दि.

१२.१२.२०२२ रोजी प्रतिवादींना सादर केला. तथापि, प्रतिवादींनी सदरील खुलासा अमान्य करुन पुन्हा दिनांक ३०.०५.२०२३ रोजी सदरील रस्त्यावरील अतिक्रमण काढणेबाबत कायदेशीर कारवाई करण्याची बेकायदेशीर नोटीस वादीस पाठविली.

४. वादीचे कथन आहे की, सदरील रस्त्याचा वादमिळकतीशी काहीही संबंध नसताना प्रतिवादींनी जाणीवपूर्वक इतरांशी संगनमत करुन वादीस त्रास देण्यासाठी व वादमिळकतीतील वादीचे घर पाडून टाकण्यासाठी खोटी नोटीस पाठविली. त्याआधारे प्रतिवादी वादमिळकतीत नसलेला रस्ता तयार करण्याच्या प्रयत्नात आहे. प्रतिवादींनी रस्ता तयार केल्यास वादीचे अपरिमित नूकसान होणार आहे. त्यामुळे वादीस दावा दाखल करावा लागला. वादीचे कथन आहे की, वादमिळकतीमध्ये नवीन रस्ता तयार करण्यास व इतर कारवाई करण्यास प्रतिवादींना तात्पूरती मनाई करण्यात यावी. वादी अर्ज मंजूर करण्याची विनंती करतात.

**प्रतिवादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :–**

५. प्रतिवादी दाव्यात हजर झाले व त्यांनी त्यांची कैफियत तसेच म्हणणे (निशाणी क्र.२१) दाखल केले. प्रतिवादींनी दाव्यातील तसेच अर्जातील सर्व प्रतिकूल कथने नाकारली. प्रतिवादींनी कथन केले की, हलदहिवडी ते उंबरगाव हा शासकीय मालकीचा सार्वजनिक रस्ता आहे. तो गट क्र.६६ व ६७ या जमिनीच्या दरम्यान असून, पूढे तिरकस गट क्र.६७ मधून पुर्वेकडे जातो. त्यावरुन सार्वजनिक वाहतूक केली जाते. सदरील रस्त्याची देखभाल व जबाबदारी प्रतिवादींची आहे.

६. प्रतिवादींचे कथन आहे की, सदरील रस्त्यावर काटेरी झाडेझुडपे वाढल्याने दळणवळणास बाधा येत आहे. वादीने हस्ते परहस्ते प्रतिवादींच्या परस्पर रस्त्याच्या क्षेत्रात अतिक्रमण करुन भराव व साईड पट्ट्यांना इजा पोहोचविलेली आहे. परिणामी रस्ता अरुंद होवून दळणवळणास बाधा निर्माण झालेली आहे. त्याबाबत प्रतिवादींकडे तक्रारी आल्याने

त्यांनी वादीस नोटीस पाठवून रस्त्यावरील अडथळे दूर करण्याबाबत कळविले. तरी देखील वादीने रस्त्यावरील अतिक्रमण न काढून रस्त्याबाबत विनाकारण वाद निर्माण केलेला आहे.

७. प्रतिवादींचे कथन आहे की, वादी हा रस्त्याच्या क्षेत्रात अतिक्रमण करुन हक्क प्रस्थापित करु इच्छीत असल्याचे दिसते. प्रतिवादींतर्फे रस्ता सुस्थितीत ठेवण्यासाठी रस्त्यावरील झाडेझुडपे काढण्याची कार्यवाही सुरु असुन, त्यास प्रतिबंध करण्याचा वादीस अधिकार नाही. प्रतिवादी यांना त्रास देण्याच्या हेतूने दावा दाखल झालेला आहे. वादीचा रस्ता व त्यावरील गटारीशी काहीही संबंध नाही. रस्त्याच्या दुरावस्थेस वादी कारणीभूत आहे. करिता, अर्ज फेटाळण्यात यावा.

८. खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होत असून, त्यावरील निष्कर्ष मी त्याखाली नोंदविलेल्या कारणांसाठी देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | वादी प्रथमदर्शनी हक्क शाबित करतो काय ? | : | होकारार्थी |
| २. | सोयीस्करतेचा तोल वादीच्या बाजूने आहे काय ? | : | होकारार्थी |
| ३. | तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल काय ? | : | होकारार्थी |
| ४. | काय आदेश ? | : | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ३ करिता :-**

९. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. वादातील रस्त्याबाबतचे वादीचे कथन महत्वाचे आहे. वादीचे शपथेवर कथन आहे की, वादमिळकतीपासून सुमारे ३०० फुट

अंतरावर रस्ता आहे. वादी रस्त्याचे अस्तित्व मान्य करतो. तथापि, त्याचे मिळकतीमधून प्रतिवादींनी नविन रस्ता तयार करण्यास प्रतिवादींना प्रतिबंध करण्याची विनंती करत आहे. याउलट प्रतिवादी हे वादीने रस्त्यावर अतिक्रमण केल्याची बाब तसेच रस्त्याच्या साईड पट्ट्यांना वादीने इजा पोहोचविल्याची बाब कथन करीत आहे. वादीने रस्त्यावर काय अतिक्रमण केले ? याबाबत स्पष्ट खुलासा प्रतिवादींचा नाही. वादमिळकती पासून ३०० फुट अंतरावर रस्ता असल्याचे वादीचे कथन तसेच वादीने दाखल केलेला नकाशा पाहता, रस्ता अस्तित्वात असल्याचे दिसते. त्यामुळे अस्तित्वात असलेल्या रस्त्यावरील झाडेझुडपे काढल्यास वादीचे वादमिळकतीतील बांधकाम प्रतिवादी पाडतील या वादीच्या कथनात प्रथमदर्शनी तथ्य वाटत नाही. केवळ वादमिळकतीतून नविन रस्ता प्रतिवादींनी तयार करु नये या कथनाइतपत वादीच्या हक्कात प्रथमदर्शनी प्रकरण दिसते.

१०. वादीचे कथन की, त्याचे मिळकतीपासून ३०० फुट अंतरावर रस्ता आहे हे पाहता, प्रतिवादींनी वादमिळकतीत अतिक्रमण करण्याची व वादमिळकतीस नूकसान करण्याची वादीची भिती साधार वाटत नाही. केवळ वादमिळकतीतून नविन रस्ता तयार केल्यास वादीचे नूकसान होईल ही बाब विचारात घेता नविन रस्त्याइतपत प्रकरण वादीच्या हक्कात असल्याने मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर 'होकारार्थी' देत आहे.

**मुद्दा क्र. ४ करिता :-**

११. उपरोक्त मुद्दा क्र.१ ते ३ वर नोंदविलेल्या कारणांवरुन मी या निष्कर्षाप्रत येत आहे की, अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, वरील विवेचनावरुन खालील आदेश.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वाद मिळकतीतून नविन रस्ता तयार करण्यास प्रतिवादींना या दाव्याचा निकाल लागेपावेतो तात्पूरती मनाई करण्यात येते.

३. खर्च अंतिम निकालाच्या वेळेस विचारात घेण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित) NILESH SUBHASH BUDRUK

Digitally signed by NILESH SUBHASH BUDRUK
Date: 2024.12.16 17:27:00 +0530

(नीलेश सु. बुद्रुक)

दिनांक : १३.१२.२०२४ सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर क्र. २,

पंढरपूर.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file are same word to word as per the original.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Suresh M. Malkapalli |
| (b) | Court | : | 2nd Jt. Civil Judge (S.D.), Pandharpur. |
| (c) | Signed by P.O. On | : | 16.12.2024 |
| (d) | Uploaded on | : | 16.12.2024 |